महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य.
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे -०१
**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११०** **Email ID :statecordinatormahaferfar@gmail.com**
**Web site :** https://mahabhumi.gov.in

---

**क्र.रा.भू.अ.आ.का.४/ मा.सु. / २१३ /२०२१** **दिनांक : २१ .१.२०२२**

**प्रति,**
**विभागीय आयुक्त (सर्व)**
**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषय- ई चावडी प्रणालीच्या अंमलबजावणी साठी पूर्वतयारी करणे बाबत**

महोदय,

आपल्या सर्वांचे पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली आणि क्षेत्रीय कर्मचारी व महसूल अधिकारी यांचे अथक प्रयत्नातून ई-फेरफार प्रणालीत संगणकीकृत अधिकार अभिलेखामध्ये बहुतांश अचूकता प्राप्त करण्यात आपल्याला यश आले आहे. आता हाच ई-फेरफार प्रणालीचा डेटाबेस वापरून तलाठी दप्तराचे (सर्व गाव नमुने) संगणकीकृत करून जमीन महसूल सह सर्व देय शासकीय कर व उपकर निश्चित करून ते ऑनलाईन भरण्याची सुविधा खातेदार नागरिकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. सध्या ई चावडी प्रणालीसाठी ची आज्ञावली विकसित करण्यात येत असून लवकरच त्याची वापरकर्ता चाचणी (UAT) करण्यात येणार आहे त्यासाठी खालील प्रमाणे पूर्व तयारी क्षेत्रीय स्थरावर करण्यात यावी.

१. **संगणकीकृत झालेले गाव नमुने वगळता इतर सर्व हस्तलिखित गाव नमुने अद्यावत करण्यात यावेत.**
२. **संगणकीकृत ७/१२ विसंगती दूर करून सर्व अधिकार अभिलेख अचूक करण्यात यावेत.**
३. **संगणकीकृत ७/१२ वरील जमीन महसूल व अकृषक जमीन महसूल आकारणी अद्यावत करावी.**
४. **जिल्हाधिकारी स्थरावर अधिसूचित केलेले सुधारित अकृषक प्रमाण दराप्रमाणे अकृषक ७/१२ वरील अकृषक आकारणी अद्यावत करण्यात यावी म्हणजे एकूण जमीन महसूल आकारणी योग्यरीत्या होईल.**
५. **इनाम पत्रक (गाव नमुना नं.३) मधील दुमाला जमिनीच्या जुडी किंवा विशेष आकारणीच्या नोंदी संगणकीकृत ७/१२ वर अद्यावत करण्यात याव्यात.**
६. **या महसूल वर्षाची खरीप, रब्बी, उन्हाळी व संपूर्ण वर्ष या हंगामातील बागायती पिके व नगदी पिकांची खातेनिहाय पिक पाहणी पूर्ण करावी म्हणजे शिक्षणकर, रोहयो उपकर व वाढीव शिक्षणकराची आकारणी योग्य होईल.**

**७. प्रत्येक तालुक्यातील वर्ग १ ची गावे (१० पैसे /चौ.मी. अकृषक आकारणी असलेली)  व वर्ग २ ची महसुली गावे (५ पैसे /चौ.मी. अकृषक आकारणी असलेली)  निश्चित करून ई-फेरफार प्रणालीत मार्क करणे.**
**८. प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण गावे, नगर पालिका हद्दीतील व मनपा हद्दीतील महसूल गावे निश्चित करून ई फेरफार प्रणालीत मार्क करणे.**
**९. मागील वर्षाची जमाबंदी पत्रके व तालुका नमुने १ ते ५ अद्यावत करून  तहसीलदार यांनी तपासून प्रमाणित करणे व थकबाकीदार यांची यादी तपासून प्रतीस्वक्षारीत करणे.**
**१०. तलाठी साजा व महसूल मंडळ पुनर्रचना ई फेरफार प्रणालीत अद्यावत करणे.**
**११. गावातील सर्व गाव नमुना नं. ७/१२ साठी योग्य भूधारणा व उप भूधारणा निवडलेली आहे ह्याची खात्री करावी विशेषता दुमाला / इनाम जमीन बाबत खात्री करावी या बाबत भूधारणेचे चारही अहवाल तपासावेत.**
**१२. समान नावांची खाती एकत्रित करणे आवश्यक आहेत तसेच खातेदार यांचे नावातील चुका / स्पेलिंग चुका मुळे एकाच खातेदाराची एकाच गावात अनेक खाती तयार झाली असल्यास त्यांची नावे दुरुस्त करून समान नावे करावीत व त्यानंतर समान नावांचे खाते एकत्रीकरण करावे तरच ई चावडी प्रणालीत जमीन महसूल मागणी योग्य प्रकारे व अचूक रित्या निश्चित होईल.**
**१३. गाव नमुना न.७/१२ मधील इतर हक्क रकान्यातील इतर वारसांची नावे कब्जेदार सदरी घेण्याची कार्यवाही विहित प्रक्रिया पारपाडून  पूर्ण करावी.**
**१४. शासन आदेशांप्रमाणे शेतीची स्थानिक जातीवाचक नावे  विहित प्रक्रियेने बदलण्याची कार्यवाही पूर्ण करावी.**

वरील प्रमाणे **अभिलेख अचूकरीत्या अद्यावत करण्यासाठी क्षेत्रीय स्थरावर विशेष मोहीम घेण्यात यावी** तरच ई चावडी प्रणालीचा वापर योग्यरीत्या होईल. सदरच्या सूचना सर्व वापरकर्ते यांच्या निदर्शनास आणाव्यात व ही कार्यवाही मार्च अखेर पूर्ण करून घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

स्वाक्षरीत

**(एन.के.सुधांशू)**
**जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख (म.रा,), पुणे**

**प्रत,**

**मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई३२ यांना महातीसाठी**

**प्रत , मा. उप आयुक्त महसूल, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व)  यांना माहिती साठी व कार्यवाहीसाठी**
**प्रत , उप जिल्हाधिकारी तथा डी.डी.ई. (सर्व)**
**प्रत , उप विभागीय अधिकारी (सर्व)**
**प्रत , तहसीलदार (सर्व)  सदरच्या सुचना प्रमाणे कार्यवाही आपले तालुक्यात पूर्ण करावी .**

RAMDAS HARIBHAU JAGTAP

Digitally signed by RAMDAS HARIBHAU JAGTAP
Date: 2022.01.21 22:51:34 +05'30'

**राज्य समन्वयक ई फेरफार प्रकल्प**